म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९१८

# तडजोड

REFBK-0024086
REFBK-0024086

नीता शाह

## आमची नवी प्रकाशने

संध्याकाळचा चेहरा /
मृणालिनी जोगळेकर / रु. २२

विनपानांची झाडं /
विजया जहागीरदार / रु. २०

पूर्वीचे लेणे / वीणा आलासे / रु. १४

फ फजितीचा फ / वा. रा. सोनार / रु. २०

तवारीख / यदुनाथ थत्ते / रु. २४

ते अज्ञात बेट / सुभाष सोनवणे / रु. २०

महामानव डॉ. आंबेडकर / संपादित / रु. ४

तळघरातलं पाणी / भा. ज. कविमंडन / रु. २०

इथलेच जळ, इथलीच माती /
वा. रा. सोनार / रु. २५

मिटलेली कवाडे / मुक्ता सर्वगोड / रु. २०

### आ गा मी

रूपरेषा / वि. वा. शिरवाडकर

अम्लान / मं. वि. राजाध्यक्ष

लव्हेवल / सुलभा भानगावकर

निम्बोळ / नि. कृ. ठाकरे

मागे पुढे जालो लाटा / भाऊ काळवीट

मी... नर्सबाई / मेघा किराणे

पुन्हा भेटू या / डॉ. सुरेंद्र बारलिंगे

वेदना / जयप्रकाश गवळे

सायंकाळच्या सावल्या / प्रभाकर पाध्ये

मरुद्गान ( ति. आ. ) / वा. रा. सोनार

स्वरमयी / डॉ. प्रभा अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. २४९८८ / २४०८६
काव्य ३१।१२।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

२४९८
२४०८६
३१/१२/८३

REFBK-0024086
REFBK-0024086

# तडजोड

नीता शाह

चेतश्री प्रकाशन

प्रकाशक
सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन, अमळनेर

सर्व हक्क
नीता शाह

प्रथमावृत्ती
आक्टोबर, १९८३

मुखपृष्ठ
सुमित्रा अवचट

छायाचित्र रेखाटणे
दिलीप कुलकर्णी

या संग्रहास महाराष्ट्र राज्य सा. सं. मंडळाचे 'नवलेखकास उत्तेजन' योजनेतील अनुदान लाभले आहे.

मुद्रक
चिं. स. लाटकर
४६१/४ सदाशिव पेठ,
शिव-पार्वती, टिळक रोड,
पुणे ४११ ०३०

किंमत बारा रुपये

अनोळख्या पाऊलवाटांचे आकर्षण
मला नेहमीच वाटत आले आहे.
अशा वाटांवरील काही
पाऊलखुणांना—

# आधीचे दोन शब्द

हा माझा पहिलाच कविता-संग्रह. भावना व्यक्त करायला माझ्याजवळ शब्द नाहीत. मला या प्रांताकडे खेचून आणणाऱ्या अनेक निर्जीव-सजीव घटना, व्यक्ती आहेत. त्या सर्वांची कृतज्ञ जाणीव आहेच. वेगळ्या वाटांची वळणे हाही महत्त्वाचा. अशा वाटांची कित्येक ऋणे आहेत.

येथे दोन गोष्टी सांगाव्याशा वाटतात. या संग्रहात काही विभाग पाडलेले आहेत. ते आधी हेतुतः करून नंतर त्यानुसार कविता केलेल्या नाहीत. सर्व कविता संग्रहित करताना, ज्या कवितांची अनुभूती नंतर तटस्थ दृष्टीला समान पातळीवरची वाटली, त्या कवितांचा आपाप्पतः एकेक विभाग निर्माण झाला. ( जरी त्यांचा काळ भिन्न असला तरी ! ) त्या काही प्रमाणात वेगळ्या करायचा एक प्रयत्न.

कवितेच्या जन्मवेळेचे टिपणही तसे मला फारसे मान्य नाही; एवढ्याकरिता की कविता पुष्कळदा कितीतरी दिवसांपासून, कदाचित अनेक वर्षांपासूनही, आपल्या अंतर्मनात कुठेतरी कणाकणाने जन्म घेत असते. यामुळेच कागदावर अवतरण्याच्या प्रक्रियेशीच जन्मकालाचे नाते लावण्याच्या संदर्भात माझ्या सर्व कवितांच्या जन्मकाळाचे मला भान नाही. म्हणूनच असा निर्देश केलेला नाही.

या माझ्या कृतींमागे कळत नकळत अनेकांचे श्रेय आहे. घरच्यांचे तसेच बाहेरच्यांचे उत्तेजन, कौतुक आहे. त्यांचा ऋण-निर्देशही त्यांना आवडणार नाही.

चेतश्री-प्रकाशनाचे श्री. वा. रा. सोनार व सौ. यशोदा सोनार यांचे प्रोत्साहन सतत मिळत आले.

श्रीमती सुमित्रा अवचट यांचे मुखपृष्ठ, श्री. दिलीप कुलकर्णी यांची रेखाटणे व छायाचित्र आणि श्री. लाटकरांच्या कल्पना मुद्रणालयाची देखणी छपाई या साऱ्याच संग्रहाचे सौंदर्य वाढविणाऱ्या बाबी. या सर्वांचे मनापासून आभार.

श्री. सतीशने या सर्व सोहळ्यात मनापासून मदत केली आणि अर्थात त्यासाठी त्याचे आभार त्याला आवडणारही नाहीत.

— **नीता शाह**

# अनुक्रम


| | |
|---|---|
| **कविता मीरेच्या** | १ |
| **कविता – एकटीच्या – एकाकीच्या** | ९ |
| या संध्याकाळी | १४ |
| सावली | १७ |
| अपराधी | २० |
| **कविता पावसाच्या** | २३ |
| आठवण | ३२ |
| दावा | ३३ |
| **कविता स्वप्नांच्या** | ३५ |
| डोळे सूर आणि स्वप्न | ३६ |
| तिरडी | ३७ |
| दरड | ३८ |
| **कविता रानीवनीच्या** | ४१ |
| रानफूल | ४२ |
| लक्ष्मणरेषा | ४४ |
| हसताना | ४६ |
| सूर्य | ४७ |
| शुष्क तृणागत | ४९ |
| आवाज | ५० |
| ही पहाट | ५१ |
| **कविता तुझ्यामाझ्या** | ५३ |
| आणभाक | ६० |
| सूड | ६३ |
| ओढ | ६० |
| पक्षी | ६८ |
| तडजोड | ७० |

# कविता मीरेच्या

तुझ्या नि:शब्द नि संथ डोळ्यात
प्रार्थनेसाठी फक्त हुंकार असतात.
मीरे, या कुजबुजणाऱ्या ओठांजवळ
प्याला कशाला धरलास विषाचा ?
अग, माझ्या या स्वप्नांच्या स्मशानात
कधी वाकून पाहिलेस ?
या उदास, हळव्या पापण्यांआड
हसू असते तुझ्या सदाफुलीचे
मीरे, तुझ्याच सदाफुलीचे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९९८
दा. क्र. २४०८६
काव्य ३१।१२।८३
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

मीरे, तुला पाहून वाटतंय
माझे पक्षी उडायचच विसरलेत
या झाडांवरच्या पानापानांच्या श्वासांत
तुला हाका ऐकू येत नाहीत ?
मीरे, या भजनाच्या ओबडधोबड
शब्दांआड तुझीच एखादी लय
सूर लावलेली दिसतेय
कधीचा त्या लयीमागून फिरतोय,
डोंगरराशीतून, अंधारगात्रातून
कधीतरी मधूनच अमावस्येच्या रात्री
हळूच उगवणाऱ्या चांदण्यासारखी
तू उमटतेस आभाळपीसावर
पण माझ्या या पहाण्याला
नि तुझ्या या दिसण्याला
मीरे, साक्ष असते फक्त अमावस्येची रात्र
पण मला ' वेडा-पीर ' म्हणणाऱ्यांना
हे कुठे ठाऊक असते ?
तुझ्या डोळ्यातील उखाणा
सोडवायचाय मला अजून.

कुठेतरी तूच कण्हतेस असह्य वेदनेने
समजून धुंडाळतोय
मीरे, गाण्याच्या मैफली न् मैफली
तुझ्या दर्दची तिथे झळही नाही
तर सदाफुलीची छाया कुठून मिळणार?
वैशाखाच्या भरदुपारी फिरतोय
वेदना उरीपोटी घेऊन
एका सदाफुलीच्या छायेसाठी.

मीरे, त्या संध्याकाळी तू बागेत आलीस ना !
गुलमोहरांना देखिल सुवास दरवळला
नि त्या रक्तवर्णीय पाकळ्या
या हृदयाशी गुंतून राहिल्या बघ !
कारण त्यांना रंगही तुझाच होता.

मीरे, तू जेव्हा नसतेस ना
डोळे शोधत असतात निळाईत
तुझ्याच डोळ्यातील स्वप्ने
नि तू जेव्हा असतेस तेव्हा...
तेव्हा... जाऊ दे !

मीरे ! तू नि मी सात पावलं
कधीच एकत्र चाललो नाही
पण माझ्या गाण्यांना
तुझे सप्तसूर जुळलेत केव्हाच
त्याचं काय ?

मीरे ! ही गाणी कुणासाठी ?
तुझ्यासाठी, माझ्यासाठी
की, आपल्या वेदनांसाठी.

मीरे, येताना साऱ्या
वादळांना बरोबर घेऊन ये.
मी दिवे पेटवून ठेवलेत
तुझ्या आल्यानंतर ते
विझू न द्यायची जबाबदारी माझी
त्यांनाही कळू देत
कुणासाठी कुणी कसं जळावं.

# कविता – एकटीच्या
## – एकाकीच्या



आजची दुपार उदास
सावल्याही उदास
दूर दूर पर्यंत
या वाटाही उदास

खरं सांग
माझी शपथ आहे तुला
तू मला हाक दिली नाहीस ?
त्या शिवाय का इतकं वादळ सुटलंय ?

समोर केळीची बाग फुललेली
मागे ओसाड रान विस्कटलेले
मध्येच मी उभी
दोघांचा आगापिछा संभाळीत.

रात्रीच्या शांत प्रहरी
झाडांच्या सावल्या एकमेकांत मिसळतांना
मीही तृप्त होते
माझ्याच सावलीला उराशी कवटाळून
पण, मला काय ठाऊक
माझ्याही सावलीला शाप आहे
दाट काळोखाचाच

आता हा निवांतपणाही नकोसा झालाय
आयुष्य असंच झोकून द्यावं
चित्रातल्या रेघोट्यासारखं...
प्रत्येकाला वेगवेगळा आकार असतानाही
आकारात निराळेपण न जाणवणाऱ्या
एकट्याच्या गर्दीपेक्षा
गर्दीतलं एकटेपण किती चांगलं
छे ! ते एकटेपण रहातच नाही

वडाच्या पारंब्यासारखे
आयुष्यात दूरवर पसरलेत असंख्य निर्बंध
रुढया; या स्त्री वर आधारासाठी
तरी देखिल तिला आधारासाठी लागतो
आणखी एक पुरुषच.
मग तो पुरुष तिचा आधार घेणार असो.
पण लोकांकरता तो तिचा आधार असतो,
हा नर मादीवर बलात्कार करतो,
बायकोवर करू शकतो
असंख्य स्वप्नांवर करू शकतो.
चालीरीतीच्या नावाखाली
या पारंब्या तिला नाचवत राहतात कठपुतलीसारखे
तिला का ठाऊक नसावे
त्यांचाच विळखा शेवटी
घोट घेणार आहेत तिचा.

# या संध्याकाळी

या उदास संध्याकाळी
जखम कशी गडद होत जाते
गजलेल्या धुनसारखी
नसानसातून वादळ उडवित जाते
पेटता क्षणीच विझत जाते.

या हिरमुसल्या संध्याकाळी
हा निवांतपणा, हे मोकळेपण
सारेच कसे भिरभिरत येते
सादाशिवायच्या पडसादाप्रमाणे
मन अधांतरी लोंबकळत रहाते.

या विझल्या संध्याकाळी
चांदणं सुरेख ठिबकतांनाही
सारंच कसं अंधारलं जातं
हिच्या गजांतून
काळच कसा निसटत जातो.

या मिटल्या संध्याकाळी
वाऱ्यांची पावलंही अवघडत जातात
पानांची सळसळही अपराध्या
सारखी कुजबुजत रहाते
ओढाळ चाल कशी फरफटत जाते.
या संध्याकाळी, या संध्याकाळी
रात्रच कशी उगवत नाही.

कुठेतरी दूरवर बुरुज दिसल्यावर
अंधूक संध्याकाळी
मला तिथे दिसते
मूक अश्रू गाळणारी एक
" बिच्चारी राणी "
कित्येक उदास संध्याकाळी
मीच राणी असल्यासारखं वाटतं
आणि कित्येक बुरुजांचे
निर्जिव दगड, आपलेसे बोलके वाटू लागतात.
या ' पत्थरामुळेच ' राणी
इतक्या वर्ष जगून् असली पाहिजे
राणीचे ते अश्रू, तिचे
बुरुजांशी मनोगत
अजूनही स्पष्ट कहाणी सांगतात
किंचितशी तिची
किंचितशी माझीही.

कधी कधी सावलीतून,
उन्हातून भटकतांना
मृगजळ दिसते तुझेच.
अरे, पण
अचानक उन्हाचे पंख
कधी जळू लागले, कळलेही नाही
सारी दुपार थंड थंड झाली
कधी कधी हा थंडपणाच
किती असह्य होतो नाही
आता कसलं मृगजळ
नि कसला तुझा भास.

# सावली

निवडुंगांचे काटे तळहातावर रोवून
नि मऊ गर पायाखाली दाबून
उभी असते वैशाखाच्या भरदुपारी
शुष्क एका बोरीखाली
तिच्या सावल्यांची बेरीज वजाबाकी करीत
तोच सावली म्हणाली
माझ्याही काट्यांवर धर ना !
तुझी दाट पातळ सावली

मी भयंकर उध्वस्त झालेय
मांडता मांडताच विस्कटलेय
अवेळीच कसा बरसला हा वैशाखढग
काहीही खुणा न ठेवता
एकदमच आकाश कसे रिते झाले
माझाच सूर लागत नव्हता
कि, खरेच तार तुटली होती.
तुझ्या सर्द आठवणांचा भार
कसा एकाएकी रिता झाला
हाती येता येता पाणी दूरवरचे
एकदम मृगजळ झाले.
मध्यान्हीच कसे अंधारले
शोधलेल्या वाटाही आता गवसेनात
नि, या विदीर्ण, रित्या
आसमंताच्या पार्श्वभूमीवर
मी अशी उध्वस्त, विस्कटलेली...

ही समोरची उजाड मशीद
कावळाही कधी त्यावर बसत नाही
भिंतीवरील भेगांमध्ये
गवतही उगवायला तयार नाही
समोरच्या या नव्या बंगलीमुळे
ती अधिकाधिक भकास.
त्यावर-- पाऊस पडून
रिकामं झालेलं उदास आभाळ,
जडशील मेलेला वारा
पांढऱ्या रंगाच्या जुनाट खुणा
कुठेतरी अंगाखांद्यावर मिरवीत
सुरकुत्या पडलेल्या तरी
दिवाळं निघालेल्या
नि जुन्या वैभवांच्या खुणा
चेहऱ्यावर लेऊन मशीद उभी केव्हांची
चुकलेल्या फकिराची वाट पहात.

## अपराधी

असेच कधीतरी, ओठ ओठांवर आपटू लागतात.
मन उगीचच चिडवायला लागतं
" आता निःशब्दांना म्हणे फुटणार आहे पालवी "
मग मीही निश्चयाने ठरवते
वाचायचा आज आपल्या प्रेमाचा ग्रंथ
पण, शब्द घाबरत असतात,
सूर अडकत असतात.
तरीही कुठंतरी वाटत असतं
अक्षर अडविणार तर नाहीत माझे अश्रू
पडतील का निखळून सारी बंधने
पण, येताच पुनः तू या स्थळी
साखळदंड पडतात माझ्या या शब्दांना.

आताशा खूप एकटे असावेसे वाटते
पीत हा अंधार घुटक्याघुटक्यांनी
चार दिवसांपूर्वीची रात्र अशी नव्हती
तेव्हा या पाऊलवाटाही एकट्या नव्हत्या.

माझ्या उद्ध्वस्त शिणगारावर
त्याच्या पापण्या उमलतात अलंकाराप्रमाणे
अशा वेळी फक्त त्याने
मागे वळून पहायला नको.

# कविता पावसाच्या



एकदा तरी भेट या पावसाळ्यात
तुझं सारं सारं मन
धुवून टाकीन माझ्या आसवांनी
आकाशात पाणी मला दगा देणार नाही.

पावसाचा एकेक कण आकारतोय
एकेका रुपात
गर्दी झालीय
त्यात शोधतीय तुलाच
पण छे !
तुला आकारच नाही.

एका पावसाळ्यात तूही यावेस भरून
काळ्या ढगांसारखा नको
खळखळत्या ओढ्यासारखा नको
ये उतरणीच्या हिरवळीसारखा
उन्हाळ्यातल्या पिवळ्या खुणांकरिता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९९
दा. क्र. २४०८.६
तारीख ३१।१२।८३
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

डोंगरमाथ्यावर उभी होते
हलकासा ढग चाटून गेला.
पिसू पिसू होणारा.
आठवल्या तुझ्या स्मृती
मिटू मिटू पहाणाऱ्या.

तू पसरला आहेस या डोंगरांच्या रांगांसारखा
मनात माझ्या, कुठून कुठपर्यंत ठाऊक नाही.
‘ दुरून डोंगरे साजरे ’ म्हणतात
पण तू इतका इतका जवळ येऊन रुतला आहेस
की, या पावसात पाण्याशिवाय काहीच दिसत नाही.

मागच्या मोसमांत
तू नव्हतास
हा पाऊस असाच होता
फक्त त्याला आवाज नव्हता.

तुझ्यात नि माझ्यात काहीच अंतर नाही
फक्त ही नदी
पार न होणारं पाणी
तरी पावसात एकमेकांना पाहू शकतो हेच नशिब.

तुझ्या सवे नदीकाठच्या वाळूत
मी रेघोट्या मारीत होते
यातून स्वप्नं निघाली
कधी काळी कंटाळून मीच पुरून ठेवलेली.

पहिल्या पावसाने ही वाट
कशी थरारली असेल ?
विझण्यापूर्वी
लखलखणाऱ्या वातीसारखी.

पहिला पाऊस,
जशी दूरवरून येणारी
जुन्या गजलांची धुन.

## आठवण

अशीच एक छोटीशी
कुठेतरी विसरलेली
आठवणीत जमा झालेली आठवण !
जसं कुणी भर थंडीत
बर्फाचं पाणी टाकावं
अशी एकदम शहारून आली
आणि, कुठल्यातरी क्षणी येऊन
मृत्यूच्या पार्श्वभूमीवर
गळणारे लावण्य पिऊन गेली.
बाहेर धाराधारांनी पाऊस पडतच होता.

# दावा

मनाची घागर भरता भरता
मोत्यांची माती झाली
आणि अखेर,
ह्याच काळ्या मातीनं दावा साधला.

# कविता स्वप्नांच्या



## डोळे, सूर आणि स्वप्न

या लहानशा जमिनीवर
न दिसणाऱ्या टाचांखाली
भरडले जातात निष्पाप डोळे
तरी देखील जिथे-तिथे
आहेतच रोवलेले डोळे
की, पाऊल ठेवायलाही जागा नाही
नि, या डोळ्यांनीच
माझ्या पायाची मेंदी रक्ताळली.

सारे सूर स्वतःभोवतीच फिरताहेत
कारण भोवतालच्या सूरांना
टक्कर देण्याची त्यांची ताकद नाही
कमीत कमी तू तरी श्वास कोंडून
पकडून ठेव तुझ्या हृदयात
जुईच्या गडद वासाचे
माझे ओलेचिंब स्वप्नसूर.

माझ्या या अजाण स्वप्नांसाठी
पापणी पापणीवर सत्याचे
काळे सूळ पहारा करीत बसलेत
आता डोळ्यांनीच सूड उगवल्यावर
त्या सत्याच्या खोबणीत
मी स्वप्नांना कसं ठेवणार ?

## तिरडी

आपल्याच तिरडीवरून जाताना मला दिसली
माझी तीच, धुक्यातून हरवताना
सापडलेली वाट.
उध्वस्त गाभाऱ्यातून परत ऐकू आले
तेच तुझे मुक्त सूर
या खडतर प्रवासात
अर्धपाहिल्या स्वप्नांचेच
तुझी पूजा बांधण्यासाठी
शोधतीय एखादे फूल तुटलेले.
स्वरांच्या त्या उत्तररात्री
प्राक्तनासारखी शोधणारी मी
तूच येना, इन्द्रधनुष्यांचे सूर बनून
रंगारंगातून सूर उधळ
माझे डोळे सूरांचे पराग होईपर्यन्त
माझी तिरडी पार होण्याच्या आत.

# दरड

त्या दूर स्वप्नांच्या दरडीवर
तो झिंग होऊन बसलाय
धरती, आकाशांचे अंतर विसरून
आभाळात डोळे रुतवून बसलाय.
जमिनीवर पाय रोवून
हात मात्र उंचावतोय
आकाशाला पोहचावेत म्हणून
क्षितिजापलीकडील पोकळीत हरवलेल्या
त्याला तरी काय ठाऊक असणार ?
आता पुन्हा एकदा पापणी लवताच
तो तिथेच असेल श्रांत, विश्रांत
पण, ती विश्वासाने पाय ठेवलेली
दरड मात्र कोसळलेली असेल.

स्वप्नांच्या या सरलेल्या वाटांवर
कोण उभे आहे आता ?
नको, या वाटांना शाप आहेत
पाय पोळण्याचे, करपण्याचे.

तू पुनः पुनः येथे येऊ नकोस रे
उगाच वळून वळून बघावेसे वाटते
नि, मग या थंड दुपारी
तुझे मृगजळ पाहायचेही राहून जाते.

कधी कधी स्मशानातून फिरतांना
वाटतं एखादी कब्र उघडून
आपल्या स्वप्नांच्या प्रेतांना कवटाळावं
पण, माझी कबरच
त्या गर्दीत मला ओळखू येत नाही.

अशीच डोळ्यात बांधून परत फिरताना
काळ्या गुलमोहराखाली लपलेली
माझीच स्वप्नं वसकन् अंगावर येतात
नि कवटाळून मानगुटीवर बसतात.

नि, मग त्या गदगदलेल्या रात्रीत
दिवसाचे पंख जळताना
मानगुटीवरच्या प्रेतांना सांभाळत
मी कुठे हरवले, मलाच दिसले नाही.

# कविता रानीवनीच्या



## रानफूल

आपल्या साऱ्या आठवणींची पाघरुणं
त्याच्यावर फेकली तेव्हाच
ते रानफूल हसलं खदखदून
वेशीवरचा म्हातारा
असाच रडतो
कधी खदखदत तर कधी उन्मळून
का ? हे आपण कधी विचारत नाही.
मग या रानफुलाने मला का विचारावं ?
माझ्या स्वप्नांचे धिंडवडे
याने आपल्या बंद डोळ्यातून पाहिले काय ?
पाहिले तरी त्याचा काय संबंध ?
माझ्या विस्कटलेल्या कपडयांवरून
त्याने आयुष्याचा अर्थ लावावा काय ?
आकाशातली चांदणी
कितीदा हसली, रडली, लाजली आपल्याला
तिचं रुसणं, फुगणं, लाजणं
याच्या नजरेनं टिपलं काय ?
तरीसुद्धा आपल्या मनभोर
डोळ्यांना हसण्याचा याला काय हक्क ?
माझ्या रक्ताच्या लालरंगाने
कदाचित ते बहारले असावे
तो तांबूसपणा अजूनही त्याच्या तनामनावर—
खुलुन मात्र दिसते ते दुसऱ्यांच्याच अंगावर
आपले रक्त नेहमीच आपल्याशी बेईमान असते
किंबहुना आपणच तर त्याच्याशी करत नाही ?

## रानफूल

आपल्या साऱ्या आठवणींची पाघरुणं
त्याच्यावर फेकली तेव्हाच
ते रानफूल हसलं खदखदून
वेशीवरचा म्हातारा
असाच रडतो
कधी खदखदत तर कधी उन्मळून
का ? हे आपण कधी विचारत नाही.
मग या रानफुलाने मला का विचारावं ?
माझ्या स्वप्नांचे धिंडवडे
याने आपल्या बंद डोळ्यातून पाहिले काय ?
पाहिले तरी त्याचा काय संबंध ?
माझ्या विस्कटलेल्या कपडयांवरून
त्याने आयुष्याचा अर्थ लावावा काय ?
आकाशातली चांदणी
कितीदा हसली, रडली, लाजली आपल्याला
तिचं रुसणं, फुगणं, लाजणं
याच्या नजरेनं टिपलं काय ?
तरीसुद्धा आपल्या मनभोर
डोळयांना हसण्याचा याला काय हक्क ?
माझ्या रक्ताच्या लालरंगाने
कदाचित ते बहारले असावे
तो तांबूसपणा अजूनही त्याच्या तनामनावर–
खुलुन मात्र दिसते ते दुसऱ्यांच्याच अंगावर
आपले रक्त नेहमीच आपल्याशी बेईमान असते
किंबहुना आपणच तर त्याच्याशी करत नाही ?

तरी त्याला इतकं हिणवायला काय झालं ?
शेवटी त्याचं रक्तही कधीच
गंधासह मुरलंय माझ्या नसानसांतून
आता म्हणावं हस हव तेवढं
माझ्या रक्ताने तुझ्या रक्ताला
माझी स्वप्नं घाबरणार नाहीत.

## लक्ष्मणरेषा

पिंपळपानावरचे अरेखित तुझे निर्बंध
झिरझिरीत धुक्याची वाट बनून
माझ्या मनामनावर पसरत गेले.
तुला काय ठाऊक तू नसताना
ही लवलवती पोपटी, हिरवी सूर्यकिरणं
पाठपुरावा करीत रहातात पोलिसासारखा
माझ्या स्वप्नपक्ष्यांना
ही मोरपंखी हद्द ओलांडता येत नाही
लक्ष्मणरेषेसारखी...
हे निर्बंध काढून घेतोस की
घडू द्यायचे रामायण
लक्ष्मण रेषा ओलांडून.

ऐन दुपारी लाँचमधून
दूरवर जाताना
लाटांची एकलयी नागमोडी नक्षी
तू तुझ्या लाल पदरावर ल्यालीस.
उन्हाने तकाकणाऱ्या रंगीबेरंगी
बुडबुड्यांचा कशिदा त्यावर कोरलास
हिरव्या गार पाण्याचे गच्च प्रतिबिंब...
तुझ्या सलज्ज चेहऱ्यावर
तू दूर स्तब्ध
उन्हाळी आभाळासारखी
पापण्यांची कवाडं उघड ना !
बघू दे तुझे रूप तुझ्यातच
ती नजर गच्च लपवून ठेवीन
माझ्या डोळ्यात
ठेवणीतल्या आठवणींकरिता.

## हसताना

इवली इवली बकुळ
हसताना का व्याकुळ ?
तू हसताना समोर
का फुलावा माझा मनमोर ?
आताच वाऱ्याने त्याच्या
हसण्याची वार्ता आणली
त्या शिवाय का माझा सूर जुळला ?

# सूर्य

मावळतीची किरणं
डोळ्यांनी भरभरून पितांना
तिला जाणवत राहिलं
सूर्य तिच्या रोमारोमांतून
अगप्रत्यांगातून
शरीरभर भिनतोय
आपल्या उष्ण बाहूंनी
साऱ्या अवयवांना पिळवटतोय
कुठे कुरवाळतोय, कुठे कुस्करतोय.
न जाणो उद्या हाच सूर्य
आपल्या उदरातून
बाहेर पडेल, आपलेच स्वप्न होऊन
त्याला पहाण्याकरता
पापण्यांची कवाडं तर
बंद झाली पाहिजेत
ती तर अडकलीत
त्याच्याच नजरमिठीत.

निबिड अरण्यातून
घनदाट झाडीतून
पानापानांवर
जंगलभर
कणाकणाने मला
माझ्यातून मी
कधी पेरीत गेले कळलेच नाही

सावल्या मिसळतांना
तिरके कवडसे त्यांना
चिरून जातांना
कोवळी पाने
यांना स्पर्शतांना
कवडसे वेचणारी मी
कधी संपतच गेले कळलेच नाही

झाडीतून वळवळत जाणारी
नेहमीची पायवाट
त्यावर पहारा करणारी
रानफुले
रस्त्यावरचा गुलाल
अंगभर मावळणारी मी
कधी मिटत गेले कळलेच नाही.

## शुष्क तृणागत

बंद पाकळीतून बाहेर पडण्यासाठी
हपापणाऱ्या एका परागकणाएवढे
माझ्या मनाचे बंद दरवाजे
एकाएकी उलगडतात
भिरभिरणाऱ्या पाकोळीच्या
रंगीत पंखागत.
तेव्हा माझ्या या शुष्क
बरगड्यांच्या सापळ्यात
जीव नसतो, आत्मा नसतो
धडधड नसते, धडपड नसते
हृदय नसते, हृदयातला कोपराही नसतो
असते फक्त एक मन
एका दवबिंदूसाठी आसुरलेल्या
शुष्क तृणागत.

## आवाज

कितीदिवस झालेत,
चंद्र उगवलाय,
बघ ना !
चांदण्यांनी कशा वाटा तयार केल्यात्
ज्यावर,
कुणिक पथिक दिसत नाहीत
पण, पावलांचा आवाज ऐकू येतोय.
फक्त....
अनोळखी पावलांचा बेसुमार आवाज.
किती दिवस झालेत
चंद्र उगवलाय.

# ही पहाट

ही पहाट
आपल्याच ओटीत
हजारो दीप उजळीत
कुणाला शोधायला निघालीय?
जर कुठे ही रस्ता विसरली तर...
कुठे सारे दीपच मालवले तर...
आपल्याच पदरात लपलेल्या
सूर्योदयापूर्वीच ती मावळली तर...
तर काय होईल?
आयुष्यावर वेऱ्हावणाऱ्या सावल्या विरून जातील
की, आठवणींचे लहान लहान काजवे विझून जातील?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९८
दा. क्र. २४०८६
काव्य ३१।१२।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

शुष्क गवतांवर पाय ठेवताच
एक काटा बोचला
पार आरपार हृदयापर्यंत.
खाली वाकताच, हाताला लागली
त्याच्या आजूबाजू वाळलेली
दोन, चार रानटी फुले
गवती वाऱ्यावर झुलणारी,
वाळली होती तरी विस्कटली नव्हती
ताठं होती, त्या गवतासारखी, काट्यासारखी.
तोडलेली फुले कोमजतात.
वाळलेली कोमजत नाहीत
शेजारी काटा असूनही
ती हसत होती, माझ्या डोळ्यातल्या पाण्याकडे पाहून.
वाळलेली फुले कायम रहातात...
दोन आर्त स्वरांच्या रिकाम्या पोकळीत
म्हणूनच कधीतरीची व्यथा
मनात सावली होऊन उतरते
आणि सारा शीण
उन्हातला पाऊस होऊन टपटपतो.

# कविता तुझ्यामाझ्या

तुझा एकच क्षण गेला असता
पण माझी दुनिया वसली असती.
तू ज्या क्षणाला येणार होतास
तो क्षण अजून गोंदून ठेवलाय गाभाऱ्यात.
तुझ्या दिशेने येणाऱ्या वाटेवर
मी सारी स्वप्न पसरवून ठेवलीत.
तू ज्या वाटेने येणार होतास
त्या वाटेची निशाणीही आता नाही.

मी अजून तुला विसरले नाही
तुझे डोळे मात्र सताड कोरडे
करपत्या उन्हात
जखमांनी पोखरून पोखरून
जीर्ण केली तरी
माझी मूळं अजून
तग धरून आहेत
नि तू भरभक्कम
एवढ्यात कसा कोलमडलास?

असा एकाएकी तू माझ्यात
कसा रुतून राहिलास
कि, निघता निघू नये
सल हृदयातला

ध्यानी मनी नसताना
मी कशी बदलत गेले माझ्यातून
कि समजता समजू नये
मी माझी मला

कुठे नि कशी अधांतरीत
वहात गेले साऱ्यातून
कि उरता उरू नये
किनारा बाजूला

अशी कशी मी रडता रडता
हसत गेले आठांनिशी
कि, दिसता दिसू नये
पाणी डोळ्याला

कशात नि कुठे रमता रमता
असे कसे हरवावे
कि, शोधता सापडू नये
पाय वाट दूरला.

तुझ्या येण्याला
फार अर्थ होता
प्रत्येक श्वास गीत होऊन
उमलला असता,
प्रत्येक क्षण रंग होऊन
खुलला असता.

तुझ्या न येण्याला
फार अर्थ आहे
प्रत्येक शब्द मृत होऊन
उतरत आहे.
प्रत्येक स्वप्न श्रावण होऊन
झरत आहे.

निघता निघता डोळे गाळलेस
कोपऱ्यावरच्या अंधारात
अजून या तळहातांना
अश्रूंचा सुवास आहे.

अश्रू कोसळत रहातात
आपल्या सवयीनं
काही तुझ्यासाठी
काही माझ्यासाठी.

तू येणार हे
ठाऊक असतं मला तर
अश्रूंना कडेलोट केले असते
माझ्यातून आरपार.

‘ माझ्यासाठी त्याची व्यथा होते भूल ’
मला हे सांगताना
होत असावी त्याची शब्दभूल.
कधीतरी त्याची आसवं गजरा होतात
तो गजरा माळतांना
मन माझे ओले त्याच्या आसवांत.
त्याच्या उसासाच्या पाकळ्या
गोळा करताना
माझी मी दंग सर्वांगात
त्याच्या श्वासाश्वासात.
म्हणावे त्याला नको जाऊन तुडवून
श्रावणांत भिजलेल्या माझ्या
ओल्या पापण्यांची कमळे.

## आणभाक

सोबत होतास तू जेव्हां इथल्या प्रखर उजेडात
होते– एक वाळवंट मृगजळाचे
आता इथल्या अंधारात
आहे फक्त एक फुललेले झाड
नि त्याच्या सोबतीला
तुझी एक आणभाक.

ए, माझी ओटी तू हिमशिखरांनी
भरू नकोस ना !
थंडगार माझ्या ओटीत, माझ्या ओटीत
किनई, दुपार आहे भर वैशाखाची.

असाच वणवणतांना
मी मला जळालो
तुझ्या नजरेतील गजरा
माझ्या ओटीत माळतेस का ?
नकोच जाऊ दे, ओटीतील ऊब
आता रखरखीत झाली आहे.

पावसानंतर नभाला उरलेले एकटेपण
जशी माझी कोरडी वाट,
तुझ्या असंख्य वाटांपाशी येऊन
मध्येच कुठेतरी हरवलेली...
हात पसरवून हाक देणाऱ्या या वाटा
पण माझेच पाय ठेचकाळत रहातात
माझी पहिली यातना " मी "
माझा पहिला शत्रू " मी "
या " मी "चा शेवटी अर्थ काय लावावा ?
एकटेपणा, अस्वस्थता की स्वप्नहीन आव्हान.

## सूड

माझी मेणबत्ती माझ्या फुंकरीने
मीच विझवली
त्या करपट धुराच्या
पारदर्शक पडद्यामागे
तुझाच चेहरा हसत होता—
धूर गेल्याने
पाणी आलेल्या माझ्या डोळ्यांना पाहून.
धूर तरी वाकडा तिकडा
नाच नाचून
चारी दिशेत विरघळून गेला
तू अजून इथेच कसा
माझा सूड घ्यायला.

फक्त एकदाच बोलावले असतेस सांगून परत
" मला तुझी गरज आहे "
एवढ्याच शब्दांवर परतले असते.
परंतु तू बोलावले नाहीस नि मीही आले नाही.
नि मी आले नाही म्हणून तुही बोलावले नाहीस
शेवटी दोघांना आपल्या अभिमानावरच विश्वास होता
म्हणून आपला विश्वास आपणच गमावला
आठवतं ? भांडणाकरीता तरी आपण
एकमेकांकडे तावातावाने येत होतो
आताशा तेही संपलय
आपल्या अभिमानासारखं.

निर्विकार त्याच्या त्या डोळ्यांत
विरघळतांना मी
कणाकणाने मोठी होते
आणि त्याचे डोळेच
आता माझ्या स्वप्नांत विरघळतात.

तुझ्या कवितेचा अर्थ मी
तरीही मी ‘ अर्थहीन ’
तू होतास दाहीदिशी
म्हणूनच मी ‘ दिशाहीन ’.

मी जेव्हा येते ना तुझ्यासमोर
उमलेली पाकळी बनून
कधी मिटते कधी गळते
माझे मलाच कळत नाही.

## ओढ

तू समोरच्या खडकावर बसला होतास
कावळ्यासारखा, एकाकी उदास
मी होते अलिकडच्या किनाऱ्यावर
वाळूचे इमले बांधीत.
दोघांनाही ओढ होती
मधल्या पाण्याचीच
त्या; दुधाळ, पांढऱ्या
फेसात डुबून रहायची...
किनाऱ्यावरील वाळूत मारलेल्या रेघोट्या.
गोळा केलेले शंख,
रिकाम्या ओंजळीतील वाळू,
माझे वाळूचे इमले
साऱ्यांनाच पाण्याची ओढ लागली
सारं पाण्याला पाहून मोहलं, विरघळलं
मग मीच या किनाऱ्यावर
कोरडी कशी रहाणार ?

## पक्षी

कुणी सांगावं तोही क्षण येईल
माझे नजरपक्षी
बोल्ढ लागतील
तुला ठाऊक नसेल
हे पक्षी असे उडाले का ?
माझ्या तळातील सुप्त ज्वालामुखीचा
त्यांना पत्ता लागला म्हणे
तुला जर नको होते
माझे सुनेपण
तर या रानपक्ष्यांना सांगून गेला असता
त्यांनी सुद्धा मला सोबत केली असती.

बदामाची लाल-पिवळी पानझड
अशी ही एकटी उरलेली पाऊलवाट
पण, तुझ्या येण्यासाठी
लाल जिरॅनियमची सावली
मनात माझ्या घर करून.
कशाला पकडू पहातेस, जमिनीकडे पहात
उसळी मारणारे तुझे ओठ
जमिनीचे तडे माझ्या मनापेक्षा
मोठे नसावेत
त्यातही लपवता येतील मला तुझ्या
डोळ्यातले निसटते, मऊ शब्द
दूरवरून जाणारे सीगल
तिला याचा अर्थ सांगतील काय ?

[library stamp]

## तडजोड

आणि मग मला आठवतं
माझ्या हातांना तळवे नसतात
नि तुझ्या पायांना वाटा नसतात.
पण, तरीही माझे हात
तुझ्या स्पर्शासाठी आसुसलेले असतात.
नि, तुझे पाय पायातच अडकत असतात
शेवटी कुठेतरी तडजोड हवीच असते.
बिन-तळव्यांचे हात पायाशी जुळतात
पण, पण वाटा नसलेले पाय
हाताच्या वाटा करून पुढे सरकतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९९८
अ. क्र. २४.०८६
वर्गव्य ३७१९२८३
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0024086
REFBK-0024086

## नवे ' चेतश्री ' कवितासंग्रह

चिगूर / शिवाजी नामगवळी / रु. ८
आभाळाचं दान / गणेश कुडे / रु. ८
निरालय / खलिल मोमीन / रु. १२
गावाकडच्या कविता /
जगदीश देवपूरकर / रु. १२
संवाद / वर्षा देशपांडे / रु. १०
वेळूबनातली शीळ /
अनुराधा साळवेकर / रु. १५
आभास / उषा मेहता / रु. २०
उसासा / दत्ता वाघ / रु. ७
तडजोड / नीता शाह / रु. १२

## आगामी कविता संग्रह

हंबर / रामकली पावसकर
अस्वस्थ शतक / अर्जुन कोकाटे
आकाश मोगरा / विजया जहागीरदार

### बालवाङ्मय

दारे देवाची / वा. रा. सोनार / रु. ६
साखरझोप / ज. रा. नेवाडकर / रु. ७
स्वप्नसफर / उमा कायंदे / रु. ५
लपाछपी भा. १ व २/
विजया जहागीरदार / रु. ६ प्रत्येकी
हिरकण्या / विजया जहागीरदार / रु. ६